निवृत्तिवेतनविषयक लाभ प्राधिकृत करण्यास होणारा विलंब.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांकः सेनिवे-1095/74/सेवा-4,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 27 मे, 1997.

**प रि प त्र क**

निवृत्तिवेतनाच्या आणि उपदानाच्या रकमांचे निर्धारण व प्राधिकृती संबंधातील कार्यपध्दतीबाबतच्या तरतुदी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 च्या नियम 118 ते 135 अन्वये विहित करण्यात आल्या आहेत. निवृत्त होणा-या कर्मचा-यास निवृत्तिनंतर निवृत्तिवेतनविषयक लाभांचे प्रदान लवकरात लवकर व्हावे या हेतूने सदर तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत. या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतच्या सूचनाही शासनातर्फे सर्व संबंधितांना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. तथापि असे निदर्शनास आले आहे की, काही प्रकरणी महालेखापाल, मुंबई/नागपूर, कार्यालय प्रमुख व कोषागार अधिकारी यांच्यात आवश्यक तो समन्वय साधला न गेल्याने निवृत्तिवेतनविषयक लाभ प्रदान करण्यास विलंब होतो.

2. या संदर्भात मा. उपलोकआयुक्तांनी देखील शासनाच्या असे निदर्शनास आणले आहे की, काही प्रकरणी उपदानाची रक्कम प्राधिकृत करण्यास महालेखापालांच्या कार्यालयाकडून विलंब होतो. या संबंधात संबंधित कार्यालयांनी पाठपुरावा करुनही महालेखापालांच्या कार्यालयाकडून प्राधिकार पत्र देण्याची कार्यवाही विलंबाने करण्यात येते. मा. उपलोकआयुक्तांनी या संदर्भात महालेखापाल (ले. व अ.)-1, महाराष्ट्र, मुंबई यांच्याशी चर्चा केली असून त्यास अनुसरुन सर्व कार्यालय/विभाग प्रमुखांना आता असे निदेश देण्यात येत आहेत की, उपदान किंवा तत्सम रकमा अदा करण्यास महालेखापाल कार्यालयाकडून प्राधिकार पत्राची प्रत प्राप्त होणेसाठी दोन पत्रे पाठवूनही प्रतिसाद न मिळाल्यास, ही बाब त्यांनी त्यांच्या विभाग प्रमुखामार्फत, अर्धशासकीय पत्राद्वारे संबंधित उप महालेखापाल (निवृत्तिवेतन) यांच्या निदर्शनास आणावी.

3. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 च्या नियम 127 चा उपनियम (1) (ए) च्या तरतुदीनुसार लेखा परीक्षा अधिका-याने निवृत्तिवेतन प्रदान आदेश, शासकीय कर्मचा-याच्या सेवानिवृत्तिच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या महिन्याभरातच निर्गमित केले पाहिजेत, त्याअगोदर निर्गमित करता कामा नये, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. शासन या संदर्भात आता असा खुलासा करीत आहे की, लेखा परीक्षा अधिका-याने सेवानिवृत्तिच्या तारखेच्या किमान एक महिना अगोदर निवृत्तिवेतन प्रदान आदेश निर्गमित करणे उपरोक्त नियमांच्या तरतुदींना अभिप्रेत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसंत चौधरी,
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-1, महाराष्ट्र, मुंबई (80 प्रती),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-1, महाराष्ट्र, मुंबई (80 प्रती7,

एच-471(13,000+40-6-97)　(कृ.मा.प.)

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-2, महाराष्ट्र, नागपूर (40 प्रती),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-2, महाराष्ट्र, नागपूर (40 प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (40 प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (5 प्रती),
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयातील सर्व विभाग,
मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयाचे प्रमुख,
वित्त विभागातील सर्व कार्यासने (ग्रंथालय 5 प्रती),
निवड नस्ती, कार्यासन सेवा-4.

* पत्राद्वारे.